## *एफ. वाय. बी. ए. (सेमिस्टर – १ )*
## *विषय : मराठी साहित्य : कथा आणि भाषिक कौशल्यविकास*

*प्रा. डॉ. दत्तात्रय बाळासाहेब वेलजाळी*
*एम.ए.नेट, सेट, पीएच. डी.*
*(मराठी विभागप्रमुख, सिन्नर महाविद्यालय)*

## घटक - ३) भाषिक कौशल्यविकास

### अर्जित कौशल्य - ३. लेखन कौशल्य :

### लेखन कौशल्याचे स्वरूप :

भाषिक कौशल्यातील लेखन हे कौशल्य अधिक महत्वाचे आहे. उच्चारित म्हणजे मौखिक भाषेचे ते चिन्हांकित रूप असते. अक्षर ओळख असलेली सुशिक्षित व्यक्ती आपले बोलणे-विचार, अक्षररूपाने प्रकट करते तेव्हा नकळत या लेखन कौशल्याचा ती स्वीकार करत असते. अध्ययन प्रक्रियेत वाचनाप्रमाणेच लेखन कौशल्य महत्वाचे आहे. ते प्रयत्नसाध्य आहे. जाणीवपूर्वक ते आत्मसात करून लेखनाच्या क्षेत्रात आपले वेगळेपण सिद्ध करता येते. भाषेतील विविध शब्द, त्यांचे अर्थ, -हस्व की दीर्घ या उच्चारणाप्रमाणे त्यांचे लेखन, व्याकरणिक नियम, अक्षरओळख, शब्दसंग्रह, सुवाच्च लेखन, हस्ताक्षर, मनातील विचार समर्पक शब्दात मांडण्याची क्षमता इ. गोष्टींचा स्वीकार केला म्हणजे या भाषिक क्षमतेचा विकास साधता येतो. व्यावहारिक जीवनात भाषेचा विविध स्तरावर आपण वापर करत असतो. पत्रलेखन, कार्यालयीन लेखन, अध्ययन-अध्यापन क्षेत्रातील लेखन, वृत्तपत्रीय लेखन, ग्रंथलेखन इ. आपल्या परिचयाच्या क्षेत्रात त्याचा आपण अनुभव घेतो. या विविध स्तरावरील भाषिक रचना छापील किंवा मुद्रित स्वरूपात असतात. त्यासाठी शुद्धलेखनाचे नियम, व्याकरणिक नियमांचा आधार घेतलेला असतो. त्यामुळे लेखनाला एक वेगळे स्वरूप प्राप्त होते. लेखन हे आपल्या विचारांचे मूर्त स्वरूप असते. त्यासाठी लेखनकौशल्य जाणीवपूर्वक आत्मसात करणे आवश्यक आहे.

## लेखन कौशल्याच्या व्याख्या :

- मनातील विचारांचे अक्षररूप म्हणजे 'लेखन' होय.
- आशयाची मूर्तरूपाने केलेली मांडणी म्हणजे 'लेखन' होय.
- अक्षरांच्या माध्यमातून परस्परांशी साधलेला संवाद म्हणजे 'लेखन' होय.
- भाषिक चिन्हांचा वापर करून आपल्या विचारांचे अर्थपूर्ण चिन्हांकित प्रकटीकरण म्हणजे 'लेखन' होय.
- आपल्या मनातील विचार इतरांना सहज समजतील अशा त-हेने योग्य शब्दात लिहिणे म्हणजे लेखनकौशल्य होय.

'वर्ण-अक्षर-शब्द-वाक्य यांची व्याकरणिक नियमांच्या आधारे मांडणी करून केलेले लेखन म्हणजे शुद्धलेखन होय.'

## लेखन कौशल्याचे महत्त्व :

- माहिती सुसूत्रपणे स्मरणात ठेवण्यासाठी
- पुनरावलोकनासाठी
- माहिती दीर्घकाळ जतन करण्यासाठी, प्रसारीत करण्यासाठी
- वेळ वाचविण्यासाठी
- व्यवहार सुकर, नेटका व व्यक्तिगत जवळिकीचा वाटण्यासाठी
- आत्माविष्कार व स्वयंमूल्यमापनासाठी

## लेखन कौशल्यातील अडचणी :

- मानसिक तयारी नसणे
- आत्मविश्वास नसणे
- न्यूनगंड वाटणे
- लिहिण्यायोग्य विषय स्वत:जवळ नसणे
- लिहिण्याची गरज वाटत नसणे
- पुरेसा वेळ नसणे
- फार मोठेकष्ट वाटणे
- श्रुतलेखन करताना अनेक अडथळे येणो
- परिश्रम करण्याची तयारी नसणे
- दृष्टीदोष, श्रवणदोष असणे
- पूर्वतयारी केलेली नसणे
- तंत्र, पध्दती माहिती नसणे
- योग्य वातावरण, पुरेसे लेखनसाहित्य, जागा नसणे.

## लेखन कौशल्य आत्मसात करण्यासाठी आवश्यक उपाययोजना :

- विषयाचे पूर्ण ज्ञान मिळवावे.
- काय लिहावयाचे याविषयीची स्पष्टता असावी.
- शुद्धलेखन नियमांचा चांगल्या प्रकारे परिचय असणे आवश्यक आहे.
- आपल्याजवळ विपुल शब्दसंग्रह असावा.
- समर्पक शब्दांची निवड करण्याची क्षमता आत्मसात करणे गरजेचे आहे.
- मनाची एकाग्रता असावी.
- सुंदर हस्ताक्षरासाठी लेखनाचा सराव करावा.
- योग्य पद्धतीने विचार मांडण्याची क्षमता विकसित करणे व त्यामध्ये नेमकेपणा येणे महत्वाचा आहे.
- ज्या भाषेतून लेखन करावयाचे आहे त्या भाषेवर प्रभुत्व मिळविणे आवश्यक आहे.
- व्याकरणिक नियमाचा परिचय असणे आवश्यक आहे.
- मनोबल वाढविणे व सकारात्मक भूमिका ठेवणे गरजेचे आहे.
- लिहिण्याचा हेतू व तंत्र समजावून घेणे व त्यानुसार संदर्भसामग्री जमा करावी.
- पुरेसा वेळ देण्याची व परिश्रम करण्याची तयारी ठेवावी.
- लेखनाचे लक्ष्य निश्चित करून त्यासाठी प्रभावी आराखडा तयार करून घ्यावा.

## ‘सुलेखन’ कसे करावे ?

- वाचता येईल असे सुवाच्य मोठे अक्षर असावे.
- सुटे ,सरळ , एकसारखे अक्षर असावे.
- शब्दांत, वाक्यांत, परिच्छेदात पुरेसे अंतर हवे.
- सर्व बाजूंनी पुरेसा समास असावा.
- नवीन माहितीची भर घालण्यासाठी पुरेशी जागा हवी.
- आवश्यक तेथे अधोरेखा, अंक, चौकटी, रंगीत पेन यांचा वापर करावा.

## प्रभावी लेखनासाठी प्राथमिक घटक / प्राथमिक कौशल्ये :

- चांगले हस्ताक्षर
- अचूक व शुध्द लेखन
- विरामचिन्हांचा योग्य वापर
- गतिलेखन
- योग्य शब्दांचा वापर
- लेखनशैली